दि.१०/०६/२०२३

**प्रेसनोट**

**पालखी सोहळयाचे जीपीएसव्दारे प्रत्येक अपडेट " एका क्लिकवर"**

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज आणि जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज पालखी प्रस्थान सोहळा अनुभवता यावा याकरिता **जीपीएसद्वारे** खास लाईव्ह पालखी ट्रॅकिंगची सुविधा उपलब्ध केली आहे.

श्री क्षेत्र आळंदी देवाची येथुन संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज आणि श्री क्षेत्र देहूमधून जगद्‌गुरु संत तुकाराम महाराज पालखी सोहळा दि.१२/०६/२०२३ रोजी पुण्यात दाखल होणार आहे.

संत ज्ञानेश्वर महाराज आणि जगदगरू संत तुकाराम महाराज पालखी सोहळयाची माहिती तात्काळ मिळण्यासाठी जीपीएस प्रणालीचा वापर केला जाणार आहे.

यावर्षी पहिल्यांदा दोन्ही पालख्यांची अपडेट जीपीएसव्दारे मिळणार आहे. पालखी संचलन लाखो वारक-यांसह दुरवर पसरलेले असल्याने, पालखी सोहळयातील दिंडयांची अपडेट दिले जाणार आहे.

पालखी मार्गाची सर्व माहिती नागरिकांसह वाहनचालकांना मिळावी यासाठी पुणे पोलीसांनी खास वेबपेज (**diversion.punepolice.gov.in)** तयार केले आहे. त्यामुळे नागरीकांना आणि वाहनचालकांना मोबाईलसह, लॅपटॉपव्दारे एका क्लिकवर सर्व पालखी अपडेट मिळणार आहे. पालखी प्रस्थान दरम्यान होणारी वाहतुक कोंडी टाळण्यासाठी वेबपेजचा उपयोग होणार आहे. बंद असलेले रस्ते, वाहतुकीसाठी खुले असलेले रस्ते, पालखीचा मुक्काम याची माहिती नागरिकांना वेबपेजव्दारे मिळणार आहे. त्यामुळे वाहतुक व दैनंदिन जीवनातील कामे सुरळीत होण्यास मदत होईल.

पुणे पोलीसांनी तयार केलेल्या वेबपेज **diversion.punepolice.gov.in** या लिंकवर क्लिक करुन नागरिक पालखी सोहळा आणि वाहतुक मार्गातील बदलाची माहिती घेऊ शकतात.

पालखीचे LIVE LOCATION प्राप्त होणेकरीता दोन्ही पालख्यांबरोबर ०४ मोटार सायकल ठेवण्यात येणार असून त्यावर जीपीएस यंत्रणा बसविण्यात आलेली आहे. त्याव्दारे वाहतुकीचे नियोजन तसेच पालखी मार्गावरील संभाव्य बंदोबस्त नियोजन अधिक सुलभ होणार असून पालखीच्या ठिकाणाची बंदोबस्तवरील सर्व अधिकारी, कर्मचारी व नियत्रंण कक्ष यांना तात्काळ माहिती उपलब्ध होणार आहे.

त्यामुळे फक्त एका क्लिकवर वारी सोहळयाचे अपडेट मिळवणे सोपे होणार आहे. तसेच एसएसपीएमएस कॉलेज मैदान, सिंचननगर, रेसकोर्स या ठिकाणी दर्शनासाठी आलेल्या भाविकांसाठी व पालखीतील वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था केलेली आहे. वर नमुद पार्किंग ठिकाणे diversion.punepolice.gov.in या वेबपेजवर दर्शविण्यात आलेली आहे.

सदर वेबपेजचा वापर करुन होणारी संभाव्य गैरसोय टाळून नागरिकांनी पोलीसांना सहकार्य करावे.


COPS EXCELLENCE
Healthy, Strong, Capable Police
COPS EXCELLENCE
(CENTER OF POLICE SERVICE EXCELLENCE)
...a transformative laboratory of Pune City Police

2:48 4G

diversion.punepolice.gov.in

पुणे पोलीस

**Namaskar, Pune!**

येत्या १२ जून रोजी ८०० वर्ष जुनी परंपरा असलेल्या पंढरपूर वारी मार्गाने ३-४ लाख वारकरी पुण्यात दाखल होणार हे आपल्या शहराचे भाग्यच आहे!

**This year, along with updating both Palkhi's Routes, Closed Roads, Live Diversions, Parking Locations, Expected Arrival Times at Next Location and Head/Tail Position of Processions from our internal data reporting app, we are going a step ahead and 'Live updating' status via GPS Devices too that will help you plan your commute better.**

**Track Palkhi**

2:51

पुणे पोलीस

# LIVE PALKHI TRACKING

GPS Tracking | Palkhi Route | Closed Roads | Diversions | Latest Updates

